अव्वल मुकदम्यात
हुकूमनामा ऑ. २०
कानु. ६, ७
फॉर्म नं.१, पुरवणी ह,
परिशिष्ट १

दिवाणी अ ३७ म

# –: तडजोड हुकूमनामा :–

मे. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांच्या न्यायालयात

नि.दि.मु.क्र. ८/२०२६

नि. २५

१) श्री. रामा गोपाळ गवस
वय सु. ६१ वर्षे, धंदा– शेती
राहणार, गोठोस, मांजरदोरावाडी,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६५१९ -- वादी

–: विरुद्ध :–

१) श्री. सखाराम गोपाळ गवस
वय सु. ६५ वर्षे, धंदा– शेती

२) श्री. चंद्रकांत गोपाळ गवस
वय सु. ५५ वर्षे, धंदा– शेती

३) श्री. लल्लूकांत गोपाळ गवस
वय सु. ५१ वर्षे, धंदा– शेती
सर्व राहणार, गोठोस, मांजरदोरावाडी,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६५१९ -- प्रतिवादी

दावा दाखल तारीख :- १३/०१/२०२६
दावा फैल तारीख :- १३/०१/२०२६

वादीच्या हिश्श्याप्रमाणे वाटप होवुन पृथक कब्जा मिळणेकरिता दावा रक्कम रुपये १०००/-

वादीचा नम्रतापुर्वक दावा असा की,


१) गाव मौजे गोठोस, ता. कुडाळ, येथील जमिन मिळकतीचे सर्व्हेवर्णनादी तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७०<br>पो.ख. ०-१६-८०<br>एकूण ३-४८-५० | १२-९४ |
| २ | १३० | २ | ०-००-५० | ०-०० |
| ३ | १३० | ३ | ०-०२-७० | ०-०० |
| ४ | १३० | ४ | ०-००-५० | ०-०० |
| ५ | १३० | ५ | ०-०९-०० | ०-०० |
| ६ | १२६ | २अ१ | ०-३७-००<br>पो.ख.१-१७-०० | ०-१० |

२) सदर दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची सामाईकातील मिळकत असून वाडवडीलांपासुन सदर मिळकती वंश परंपरेने चालत आलेली असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/४ एवढा हिस्सा आहे.

३) सदर दावा मिळकती ह्या मुळच्या वादीचे वडिल कै. गोपाळ सखाराम गवस यांच्या मालकीच्या मिळकती होत्या. सदरचे वादीचे वडिल कै. गोपाळ सखाराम गवस मयत झाल्यावर त्याना वादी व प्रतिवादी असे चार मुलगे व द्वारकाबाई हि पत्नी व रुक्मिणी कृष्णा नाईक अशी एक मुलगी असे वारस आहेत. त्याप्रमाणे दावा मिळकतीच्या सात बारा सदरी वारसतपास होवून फेरफार नं. १३७० ने वारसांची नांवे दाखल झाली. त्यापैकी द्वारकाबाई हि मयत झालेली आहे. रुक्मिणी कृष्णा नाईक हि वादी व प्रतिवादी यांची बहिण असून तिने दिनांक ३०/०५/२०१८ रोजीच्या रजिस्टर हक्कसोड दस्त नं. १३७७/२०१८ ने आपला दावा मिळकतीमधील हक्क व हिस्सा वादी व प्रतिवादी यांना दिलेला आहे. व त्याची नोंद सातबारा सदरी फेरफार नं. १६६१ ने झालेली आहे. त्यामुळे सदर दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांना प्रत्येकी १/४ हिस्सा प्राप्त झालेला आहे. सदर दावा मिळकती ह्या वडीलोपार्जित असल्याने त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना त्यांचे वडिल कै. गोपाळ सखाराम गवस यांच्या मृत्यूपश्चात वारसाहक्काने हक्क प्राप्त झालेला आहे.

४) वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाची वंशावळ खालीलप्रमाणे :-



वरील दिलेली वंशावळ ही योग्य व कायदेशीर असून ती वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबाची आहे.

५) सदर वादी व प्रतिवादी यांचा दावा मिळकतीत खालीलप्रमाणे हिस्सा आहे.

अ) वादी यांचा १/४ एवढा हिस्सा आहे.

ब) प्रतिवादी नं. १ ते ३ यांचा प्रत्येकी १/४ एवढा हिस्सा आहे.

६) सदरच्या दावा विषयक मिळकतीचे वाटप होवून मिळण्याकरिता वादी प्रतिवादी नं. १ यांचेकडे दिनांक ०१/०८/२०२५ रोजी गेले व सदर दावा मिळकतीचे वाटप करून देण्याबाबत विनंती केली असता वाटप करून देण्यास नकार देवून सदर जमिन आमची असून मी माझ्या मर्जीप्रमाणे विल्हेवाट लावणार, मग तुम्ही कोर्ट कचेरी करत रहा अशी धमकी देवून वाटप करण्यास नकार दिला. त्यामुळे सदरचा दावा वादी यांना दाखल करणे भाग पडत आहे.

७) दाव्यास कारण :- सदरच्या दावा विषयक मिळकतीचे वाटप होवून मिळण्याकरिता वादी प्रतिवादी नं. १ यांचेकडे दिनांक ०१/०८/२०२५ रोजी गेले व सदर दावा मिळकतीचे वाटप करून देण्याबाबत विनंती केली असता वाटप करून देण्यास नकार देवून सदर जमिन आमची असून मी माझ्या मर्जीप्रमाणे विल्हेवाट लावणार, मग तुम्ही कोर्ट कचेरी करत रहा अशी धमकी देवून वाटप करण्यास नकार दिला. त्यामुळे सदरचा दावा वादी यांना दाखल करणे भाग पडत आहे. त्यावेळी व तेव्हापासून ते

आजतागायत सतत या मे. कोर्टाच्या स्थळसिमेत सदर दाव्यास कारण घडत असून या मे. कोर्टात हा दावा चालविण्याचा अधिकार आहे.

८) सदरचा दावा मुदतीत दाखल केलेला आहे.

९) सदरबाबत कुठल्याही अन्य कोर्टात दावा दाखल केलेला नाही.

१०) दाव्याचा आकार :–

| | |
|---|---|
| **१०००/–** | दावा मिळकतीच्या जमिन मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होणेकरिता दावा मिळकतीचा सालीना दस्त रुपये १२.९५/– असून त्याचे ऐंशी पट म्हणजेच रुपये १०३६/–एवढा केलेला आहे. वादी यांचा सदर मिळकतीमध्ये १/४ एवढा हिस्सा असून त्याचा आकार रुपये २५९/– एवढा केलेला आहे. परंतु दाव्याचा कमीत कमी आकार १०००/– धरावा लागत असल्याने दाव्याचा आकार १०००/– एवढा केलेला आहे. त्यावर रक्कम रूपये २००/– चा स्टॅम्प लावलेला आहे. |
| **१०००/–** | एकूण आकार |

येणेप्रमाणे आकार, कोर्ट फी, प्रोसेस फी, कोर्ट अधिकार, वकील फी इत्यादी करीता मानावायाचा आहे. सदरचा कोर्ट फी व्हॅल्युएशन अॅक्ट कलम ६ अन्वये केला आहे.

११) वादीची विनंती अशी की,

अ) वादी यांचा दावा मिळकतीत १/४ एवढा हिस्सा आहे असा ठराव होवून त्या हिश्याच्या आधारे सदर दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होवून हिश्श्याचा पृथक कब्जा वादीस देवविण्यात यावा.

ब) दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होवून होणेकरीता हुकुमनामा कलेक्टर यांचेकडे पाठवावा.

क) वादीस आवश्यक झाल्यास दाव्यात दुरुस्ती अथवा बदल करण्याची सवड व परवानगी मिळावी.

ड) या दाव्याचा खर्च प्रतिवादीकडुन देवविण्यात यावा.

येणेप्रमाणे वादी तर्फे पूर्ण फैसला व्हावा.

********************

आज दिनांक १४ माहे मार्च सन २०२६ रोजी श्री.जी.ए.कुलकर्णी, पॅनल प्रमुख, राष्ट्रीय लोक अदालत तथा दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), कुडाळ, जि. सिंधुदुर्ग यांचे समोर वादी हजर त्यांच्या परोक्ष, वादीचे वकील हजर त्यांच्या परोक्ष, प्रतिवादी हजर त्यांच्या परोक्ष, प्रतिवादीचे वकील हजर त्यांच्या परोक्ष, अखेर निकालासाठी मुकदमा निघालेवरुन असा आदेश होत आहे की,

## –: ORDER :–

1. In view of the order passed below final compromise pursis filed at Exh.20 the suit is disposed of being compromised between the parties.
2. A map produced along with the pursis filed at exh.20 shall be the part and parcel of the compromised pursis.
3. Decree be drawn in terms of compromise pursis (Exh.20).
4. Compromise pursis at exh.20 shall be part and parcel of the decree.
5. Parties to bear their own costs.
6. Court fee be paid to the parties who are entitled, as per the rules.

*****************



नि. २०

संयुक्त तडजोड पुरशिस वादी प्रतिवादी तर्फे
दि. १०/०३/२०२६

# कुडाळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात

**रे.दि.मु.नं. ८/२०२६**

**श्री. रामा गोपाळ गवस -------- वादी**

**विरुध्द**

**श्री. सखाराम गोपाळ गवस व -------- प्रतिवादी**

**वादी व प्रतिवादी यांची तडजोड पुरशिस अशी की,**

१. गांव मौजे गोठोस, ता.कुडाळ येथील जमिन मिळकतीचे सर्व्हेवर्णनादी तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७०<br>पो.ख.०-१६-८०<br>एकूण ३-४८-५० | १२-९४ |
| २ | १३० | २ | ०-००-५० | ०-०० |
| ३ | १३० | ३ | ०-०२-७० | ०-०० |
| ४ | १३० | ४ | ०-००-५० | ०-०० |
| ५ | १३० | ५ | ०-०९-०० | ०-०० |
| ६ | १२६ | २अ१ | १-५४-००<br>पो.ख. १-१७-०० | ०-१० |

२. सदर दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये आपसात तडजोड झालेली असून सदर दावा आपसात तडजोड करुन मिटवण्याबाबत एकमत झालेले आहे.

३. सदर दावा मिळकत हि वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटुंबाची सामाईकातील मिळकत असून वाडवडिलांपासून सदर मिळकती वंशपरंपरेने चालत आलेले असून त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/४ एवढा हिस्सा आहे.

रामा गो. गवस सखाराम गोपाळ गवस चंद्रकांत गो. गवस [signature]

४. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्याने आपसांत तडजोड झालेल्या गांव मौजे गोठोस, ता.कुडाळ येथील जमिन मिळकतीचे सर्व्हेवर्णनादी तपशील खालीलप्रमाणे :-

**अ) वादी यांना वाटपात दिलेल्या जमिन मिळकती खालीलप्रमाणे-**

| अ. नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७० <br> पो.ख. ०-१६-८० <br> एकूण ३-४८-५० <br> **पैकी वादी यांना दिलेले क्षेत्र ०-८०-०५** | ३.२५ |

**ब) प्रतिवादी नं. १ यांना वाटपात दिलेल्या जमिन मिळकती खालीलप्रमाणे-**

| अ. नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७० <br> पो.ख. ०-१६-८० <br> एकूण ३-४८-५० <br> **पैकी प्रतिवादी नं. १ यांना दिलेले क्षेत्र ०-८०-०५** | ३.२५ |

**क) प्रतिवादी नं. २ यांना वाटपात दिलेल्या जमिन मिळकती खालीलप्रमाणे -**

| अ.नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७० <br> पो.ख. ०-१६-८० <br> एकूण ३-४८-५० <br> **पैकी प्रतिवादी नं. २ यांना दिलेले क्षेत्र ०-७१-०५** | ३.२० |
| २ | १३० | ५ | ०-०९-०० | ०-०० |

ड) **प्रतिवादी नं. ३ यांना वाटपात दिलेल्या जमिन मिळकती खालीलप्रमाणे -**

| अ.नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १३० | १ | ३-३१-७० <br> पो.ख. ०-१६-८० <br> एकूण ३-४८-५० <br> **पैकी प्रतिवादी नं. ३ यांना दिलेले क्षेत्र ०-७६-३५** | ३.२४ |

रामा गो. गवस  अनंतराम गोपाळ गवस  चंद्रकांत गो. गवस  [signature]

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १३० | २ | ०-००-५० | ०-०० |
| ३ | १३० | ३ | ०-०२-७० | ०-०० |
| ४ | १३० | ४ | ०-००-५० | ०-०० |

**इ) वादी व प्रतिवादी यांना सामाईकात ठेवलेल्या जमिन मिळकतीचा तपशिल -**

| अ. नं. | स. नं. | हि. नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १२३ | २अ१ | ०-३७-००<br>पो.ख. १-१७-०० | ०-१० |

सदर दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची आपसात तडजोड झालेली असून सदर दावा मिळकतीचे वाटप करण्याचे ठरविलेले आहे.

५. तरी वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये झालेल्या उपरोल्लेखीत तडजोड पुरशीस प्रमाणे या कामी तसा तडजोडीचा हुकुमनामा तयार करणेत येत आहे. व त्याप्रमाणे दावा मिळकतीपैकी पक्षकारांच्या हिश्श्यास नेमून देण्यात आलेल्या दावा मिळकतींच्या क्षेत्रास आपापल्या नावांची गांव कागदी सातबारांमध्ये नोंद करून घेण्याचा तसेच त्या दावा मिळकतींचे वाटप करून घेण्याचा त्यांना हक्क राहील.

६. तसेच ज्यांना कोणाला मे. जिल्हाधिकारी यांचे मार्फत आपल्या हिश्श्याचे वाटप करुन पृथक ताबा घ्यावयाचा असेल त्यांना तसे वाटप करुन घेण्याचा सुध्दा हक्क राहील. त्याकरीता तडजोड पुरशिस मध्ये नेमून दिलेल्या दावा मिळकतीच्या सातबारा सदरी आपल्या नावाची नोंद होण्याकरीता तलाठी तथा ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे अर्ज करुन नाव लावावे.

७. वादी व प्रतिवादी यांनी या दाव्याचा आपआपला स्वत:चा खर्च ज्याचा त्यांनीच स्वत:च सोसावयाचा आहे.

८. सदर वादी व प्रतिवादी यांनी आपआपल्या क्षेत्रात बांधकाम करण्यास लागवड करण्यास अगर अन्य कोणतेही काम करण्यास एकमेकांस हरकत अगर तक्रार करावयाची नाही.

९. सदर दाव्यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या मध्ये वरील अटी व शर्ती नुसार तडजोड झालेली असून तसा तडजोड हुकूमनामा करण्यात यावा हि विनंती.

रामा गो. गवस    सखाराम गोपाळ गवस    चंद्रकांत गो. गवस    [signature]

१०. सदर तडजोड पुरशिस सोबत वादी व प्रतिवादी यांनी समजूतीचा नकाशा जोडलेला असून सदर नकाशामध्ये वादी यांचे वाटपाचे क्षेत्र हे पिवळ्या रंगाने, प्रतिवादी नं. १ यांचे वाटपाचे क्षेत्र लाल रंगाने, प्रतिवादी नं. २ यांच्या वाटपाचे क्षेत्र निळ्या व भगव्या रंगाने व प्रतिवादी नं. ३ यांच्या वाटपाचे क्षेत्र आकाशी रंगाने दर्शविलेले आहे. सदर नकाशा वादी व प्रतिवादी यांना मान्य असून तो या जडजोड पुरशिसचा व हुकुमनाम्याचा भाग समजावयाचा आहे.

**येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांची तडजोड पुरशीस आहे.**

**दिनांक :-** १७/०३/२०२६

**ठिकाण :- कुडाळ**

**ॲड.सुरेंद्र धारु मळगांवकर**
**(वादी व प्रतिवादी तर्फे वकिल)**

रामा गो. गवस

**श्री. रामा गोपाळ गवस**
**(वादी)**

सखाराम गोपाळ गवस

**श्री. सखाराम गोपाळ गवस**
**(प्रतिवादी नं.१)**

चंद्रकांत गो. गवस

**श्री. चंद्रकांत गोपाळ गवस**
**(प्रतिवादी नं. २)**

**श्री. ललूकांत गोपाळ गवस**
**(प्रतिवादी नं. ३)**

-छ-



नि २० सोबत

दे.मु.नं. ८/२०२६




१) सदर नकाशा वादी व प्रतिवादी यांना मान्य आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| रामा गो. गावस | सखाराम गो. गावस | चंद्रकांत गो. गावस | (सही) |
| वादी | प्रतिवादी नं. १ | प्रतिवादी नं. २ | प्रतिवादी नं. ३ |

**ORDER PASSED BELOW EXH.20 IN**
**REGULAR CIVIL SUIT NO.08/2026**
**( CNR NO. MHSI04-000040-2026 )**

Today plaintiff and defendant nos.1 to 3 and their Ld. Counsels are present before the panel of National Lok-adalat. They have filed said compromised pursis on record. A contents of the same are read over and explained to them. They have admitted the contents of the compromised pursis in toto. They also admitted that they have signed said pursis voluntarily. A compromised pursis is also signed by ld. advocate. Thus, the compromised pursis read, recorded and verified. Necessary order below exh.01.

sd/-xxx
(G. A. Kulkarni )
Head of the Panel
of National Lok-adalat &
C.J.J.D., & J,M.F.C.,Kudal.

Date:- 14.03.2026.

## -: खर्चाचा आकडा :-

| वादी व प्रतिवादीला झालेला | |
|---|---|
| | रूपये पैसे |
| १. फिर्याद अर्जास स्टॅम्प नि.०१ वर | २००.०० |
| २.मुखत्यारनाम्यास स्टॅम्प नि.२, १८ प्र.रु.१०/- | २०.०० |
| ३. दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प नि. ५ ते १२ प्र.रु.५/- | ४०.०० |
| ४.स्पेशल बेलीफ भत्ता, साक्षीभत्ता | ००.०० |
| ५. फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडरची फी (रु.१०००/- वर ) | ४५.०० |
| ६.प्रोसेस लागू करणे | ००.०० |
| ७. कमिशन फी | ००.०० |
| ८.भाषांतराची फी | ००.०० |
| ९.नक्कला करण्याची फी | ००.०० |
| १०. इतर अर्ज नि.१६,१७,२१ प्र.रु.५/- | १५.०० |
| ११. तहकुबीबद्दल दिलेला | ००.०० |
| १२.खर्चाची रक्कम | ००.०० |
| एकूण | ३२०.०० |
| न दिलेला खर्च | |
| फिर्याद अर्जावरील दिलेला खर्च परतावा रक्कम | २००.०० |
| तहकुबीबद्दल दिलेला नि. | ००.०० |
| वकीलपत्रावरील नि. २ | १०.०० |
| खर्चाची रक्कम नि. | ००.०० |
| एकूण | २१०.०० |
| बाकी | ११०.०० |
| पूर्णांकीत | ११०.०० |

तयार करणार | तपासले बरोबर आहे

(अ.अ.परब )
कनिष्ठ लिपीक

(एम.बी.भाटकर)
वरिष्ठ लिपीक

आज तारीख १४ माहे मार्च सन २०२६ रोजी
आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिला.

23/3

(जी. ए. कुलकर्णी)
पॅनल प्रमुख
राष्ट्रीय लोक अदालत
तथा दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
कुडाळ

वादी व प्रतिवादीतर्फे वकील :- श्री.एस. जी. मळगांवकर

(ह्या मुकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते (परत) नेले नाहीत तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर अभिलेख नाश करण्याच्या प्रचलित नियमास अनुसरून नाश करून टाकण्यास पात्र होत.)